# कोविड-19 आणि दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे हक्क: मार्गदर्शन

1. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या आरोग्याच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
2. दिव्यांगे असलेल्या ज्या व्यक्ती संस्थांमध्ये राहात आहेत, त्यांच्यावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
3. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या, समाजात राहण्याच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
4. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या काम, उत्पन्न आणि उदरनिर्वाहावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
5. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या शिक्षणाच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
6. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या, हिंसेपासून रक्षणाच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
7. अशा विशिष्ट लोकसंख्या समूहांवर, ज्यांमध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती नको इतक्या प्रमाणात आहेत, कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?
    a. दिव्यांगे असलेले कैदी
    b. पुरेशी निवासाची सोय नसलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्ती

## आढावा

कोविड-19 च्या साथीमुळे समाजातील सर्वच लोकांना धोका आहे, परंतु दिव्यांगे असलेल्या व्यक्तींवर मनोवृत्तीविषयक, पर्यावरणीय आणि संस्थात्मक मर्यादांमुळे त्याचा प्रमाणापेक्षा जास्त परिणाम होत आहे, आणि या मर्यादा कोविड-19 ला दिलेल्या प्रतिसादामध्ये पुन्हा कार्य करतात.

दिव्यांगे असलेल्या अनेक व्यक्तींना आधीपासूनच विविध आरोग्य विकार असतात ज्यामुळे ते या विषाणूला बळी पडण्याची शक्यता वाढते, त्यांना जंतुबाधा झाल्यावर अधिक तीव्र लक्षणे होतात, ज्यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढते. कोविड-19 च्या संकटकाळामध्ये दिव्यांगे असलेल्या ज्या व्यक्ती दैनंदिन जगण्यासाठी साहाय्यावर अवलंबून असतील, त्या एकाकी पडू शकतात आणि त्यांना लॉकडाउनच्या बंधनांमुळे जगणे अशक्य होते, तर ज्या व्यक्ती संस्थांमध्ये राहतात त्या विशेषतः बळी पडू शकतात; आणि ही गोष्ट निवासी निगा गृहांमध्ये आणि मानसिक विकारांच्या रुग्णालयांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींमधील मृत्यूच्या मोठ्या प्रमाणावरून सिद्ध होते. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना आरोग्य सेवा आणि माहिती मिळवण्याच्या बाबतीत अडथळे अधिक प्रकर्षाने जाणवतात. तसेच दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना उदरनिर्वाह मिळवणे, उत्पन्न मिळवणे, ऑनलाइन शिक्षणाच्या प्रकारांमध्ये भाग घेणे, आणि हिंसेपासून संरक्षण मिळवणे या बाबतींमध्ये पक्षपाती वागणूक आणि इतर अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या विशिष्ट समूहांना, जसे कैदी आणि निराश्रित लोक किंवा पुरेशी निवास व्यवस्था नसलेले लोक, याहूनही मोठ्या धोक्यांना सामोरे जावे लागते.

या धोक्यांविषयी प्रबोधन झाल्यामुळे अधिक चांगले प्रतिसाद मिळू शकतील, ज्यामुळे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींवर प्रमाणाबाहेर पडणारा प्रभाव कमी होऊ शकेल. या मार्गदर्शनाचे उद्देश असे आहेत:

- या साथीच्या, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींवरील अनिष्ट परिणामाबद्दल आणि त्यांच्या हक्कांबाबत जागृती निर्माण करणे;

- जगभरात आधीच चालू करण्यात आलेल्या काही आश्वासक पद्धतींकडे लक्ष वेधणे;
- राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्ससाठी महत्त्वपूर्ण कृती निश्चित करणे; आणि
- कोविड-19 ला दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसहित सर्व बाबतींमध्ये हक्कांवर आधारित प्रतिसाद दिले जातील याच्या खात्रीसाठी अधिक शिक्षणासाठी संसाधने पुरवणे.

## 1. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या, आरोग्याच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

दिव्यांगे असलेल्या व्यक्ती हा कोविड-19 चा विशेष धोका असलेला समुदाय असूनही त्यांना या साथीच्या काळामध्ये आरोग्यनिगा मिळवण्याच्या बाबतीत अधिक मोठ्या प्रमाणात असमानतांचा सामना करावा लागतो, कारण आरोग्यविषयक माहिती आणि वातावरण त्यांना उपलब्ध करून घेता येत नाही, आणि वैद्यकीय मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रोटोकॉल्स इतके निवडक असतात की त्यांच्यामुळे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना तोंड द्यावा लागणारा पक्षपात आणखी अधोरेखित होऊ शकतो. कधी कधी हे प्रोटोकॉल्स दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या जीवनाची गुणवत्ता आणि सामाजिक मूल्यांच्या संबंधाने असलेला वैद्यकीय पक्षपात उघड करतात. उदाहरणार्थ, कमी प्रमाणात उपलब्ध असलेली संसाधने नेमून देण्याबाबतची वर्गवारीविषयक मार्गदर्शक तत्त्वे, ज्यांचे अपवर्जनाचे निकष हे काही विशिष्ट प्रकारच्या दुर्बलतांवर आधारित आहेत, जसे दैनंदिन जीवनासाठी मोठ्या प्रमाणात साहाय्यावर अवलंबित्व, "कमजोरी", "उपचारात्मक अपयशा" ची शक्यता, तसेच ते जगले तर "किती वर्षे जिवंत राहतील" याबद्दलच्या अंदाजाची गृहितके. दिव्यांगे असलेल्या व्यक्ती आणि त्यांच्या परिवारांना, त्यांना पुनर्जीवित करण्याचे उपाय सोडून देण्यासाठी वैद्यकीय व्यवस्थेमधून दबावालासुद्धा सामोरे जावे लागले आहे.

### काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?

- **सान मरिनो प्रजासत्ताकाच्या** बायोएथिक्स समितीने वर्गवारीबाबत कोविड-19 मार्गदर्शक तत्त्वे तयार केली, ज्यामध्ये दिव्यांगाच्या आधारावर पक्षपात करणे प्रतिबंधित आहे: "त्यामुळे निवडीचा एकमेव प्राचल असा आहे, की प्रत्येक मानवी जीवाचा सन्मान करत योग्य रीतीने वर्गवारी करणे, जी वैद्यकीय सुयोग्यता आणि उपचारांच्या प्रमाणावर आधारित असेल. इतर कोणतेही निवडीचे निकष जसे वय, लिंग, सामाजिक किंवा प्रादेशिक संबंध, दिव्यांग हे नैतिकदृष्ट्या स्वीकारार्ह नाहीत, कारण त्यामुळे मानवी जीवनाची एक उच्च-नीचता प्रस्थापित होईल, असे मानवी जीवन जे जगण्याची योग्यता कमी अथवा अधिक असेल, आणि त्यामुळे मानवी हक्कांचा अस्वीकारार्ह भंग होईल."[1]

- अधिकारी दिव्यांगाच्या आधारे पक्षपाताला प्रतिबंध करतील याच्या खात्रीसाठी **युनायटेड स्टेट्स**च्या आरोग्य आणि मानव सेवा विभागामधील नागरी हक्क कार्यालयाने एक पत्रक काढले , ज्यात म्हटले होते, "दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना नित्याच्या रीती, जीवनाच्या गुणवत्तेचे मूल्यमापन, किंवा अपंगत्वांचे अस्तित्व किंवा अनुपस्थिती किंवा वयाच्या आधारे एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे तौलनिक अंदाजित "मूल्य" यांच्या आधारे वैद्यकीय निगा नाकारण्यात येऊ नये.[2] पत्रकामध्ये अधिकाऱ्यांना, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना माहिती व संदेश उपलब्ध होतील आणि आपत्कालीन प्रतिसादाच्या प्रयत्नांचा फायदा मिळण्याची समान संधी असेल याची खात्री करायला मार्गदर्शक सूचना केल्या आहेत," सदर आपत्कालीन प्रतिसाद यशस्वी झाला आहे आणि त्यांची कमीत कमी निंदा होईल याच्या खात्रीस मदत करण्यासाठी योग्य त्या व्यवस्था करण्यासहित."

- **संयुक्त अरब अमिरातींनी**, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या चाचण्या त्यांच्या घरी घेण्यासाठी एक राष्ट्रीय कार्यक्रम सुरू केला असून एप्रिलच्या मध्यापर्यंत 650000 दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या कोविड-19 चाचण्या केल्या होत्या.[3] **फिलिपाइन्समध्ये** मानवी हक्क आयोगाने आरोग्य संस्थांना समाजातील बालके आणि दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसहित कमजोर गटांसाठी सार्वजनिक संदेश तयार करून पाठवण्यासाठी माहिती प्रसिद्ध केली आहे.[4]
- **कॅनडा**मध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांनी, सरकारला दिव्यांग-विशिष्ट समस्या, आव्हाने आणि प्रणालीमधील न्यूनता आणि त्यासाठीची धोरणे, करण्याचे उपाय यांवर सल्ला देण्यासाठी कोविड-19 दिव्यांग सल्लागार गट स्थापन करण्यात आला.[5]

### राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?

- दिव्यांगाच्या आधारे उपचार नाकारण्यास प्रतिबंध करणे आणि कमी प्रमाणात उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या (जसे व्हेंटिलेटर्स किंवा अतिदक्षता विभागाची उपलब्धता) वाटपासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बसणाऱ्या तरतुदींसहित अशा तरतुदी रद्द करणे, ज्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे दिव्यांग, साहाय्याच्या गरजांची पातळी, जीवनाच्या गुणवत्तेची मूल्यमापने किंवा इतर कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय पक्षपात यांच्या आधारे उपचार उपलब्ध होऊ देत नाहीत.

- ज्यांना लक्षणे दिसत आहेत अशा दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींच्या **चाचण्या अग्रक्रमाने होतील याची खात्री करणे**.
- दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्यावरील कोविड-19 च्या प्रभावाच्या **संशोधनाला उत्तेजन देणे**.
- सुविधा (रुग्णालये, चाचण्यांच्या तसेच क्वारंटाइनच्या सुविधा) उपलब्ध असतील तसेच आरोग्यविषयक माहिती आणि संदेश यांची उपलब्धता आणि प्रसार सहज उपलब्ध होणाऱ्या पद्धती आणि स्वरूपांमध्ये होईल याची खात्री यांच्यासहित **उपचारांना असणारे अडथळे ओळखून ते काढून टाकणे.**
- साथीच्या काळामध्ये दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींना **औषधांचा सतत पुरवठा होईल व ती उपलब्ध असतील याची खात्री करणे**.
- दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींच्या विरुद्ध आकस व दूषित दृष्टिकोनाच्या आधारे पक्षपात होण्यास प्रतिबंध करण्यासाठी **आरोग्य सेवकांचे प्रशिक्षण आणि प्रबोधन करणे**.
- साथीला एक असा हक्कांवर आधारित प्रतिसाद तयार करण्यासाठी **दिव्यांगे असणाऱ्या व्यक्ती आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांना अंतर्भूत करणे आणि त्यांच्याशी जवळून संवाद करणे**, ज्यामध्ये सर्वविध दिव्यांगे असणाऱ्या व्यक्ती अंतर्भूत असतील आणि जो त्यांना प्रतिसाद देईल.

### संसाधने

- कोविडच्या बाबतीत कोणताही अपवाद नाही: "प्रत्येकाला जीवरक्षक प्रणाली वापरण्याचा हक्क आहे" – यूएन तज्ज्ञ म्हणतात
- दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांबाबत, कोविड-19 बाबत यूएन स्पेशल रॅपोर्टियरचे म्हणणे: दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींचे रक्षण कोण करत आहे?
- डब्ल्यूएचओ, कोविड-19 च्या साथीच्या काळातील अपंगत्वांबाबतचे विचार

## 2. दिव्यांगे असलेल्या ज्या व्यक्ती संस्थांमध्ये राहत आहेत, त्यांच्यावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

मानसिक विकारांवर उपचार करणाऱ्या संस्था, सामाजिक सेवा संस्था (अनाथालये, डे-केअर केंद्रे, पुनर्वसन केंद्रे) आणि वृद्धांसाठीच्या संस्थांमध्ये कोविड-19 चा प्रमाणाबाहेर वाईट परिणाम होत आहे, आणि त्यामुळे बाधा आणि मृत्यू यांचे दर खूप जास्त आहेत. काही

प्राथमिक अभ्यासांमध्ये, त्या देशांमधील मृत्यूंपैकी 42% ते 57% मृत्यू हे अशा संस्थांमध्ये झाले.[6] संस्थांमध्ये दाखल केलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना कोविड-19 होण्याचा धोका जास्त आहे, याची कारणे आहेत त्यांना आधीच असलेले आरोग्यविकार, निवासी आणि कर्मचारी यांच्यामध्ये सोशल डिस्टन्सिंग अमलात आणण्यातील अडचणी, आणि कर्मचाऱ्यांनी त्यांना तसेच सोडून देणे. तसेच संस्थांमध्ये राहणाऱ्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना मानवी हक्कांच्या उल्लंघनाची पायमल्ली होण्याचा अधिक धोका असतो, जसे दुर्लक्ष, मर्यादा, एकटे पाडणे आणि हिंसा.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- **स्वित्झर्लंड आणि स्पेन**मध्ये संस्थांमध्ये राहणाऱ्या दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींना जेथे शक्य असेल तेथे तेथून बाहेर काढून त्यांच्या परिवारांसोबत राहण्यासाठी पाठवण्यात आले.
- **कॅनडामध्ये** संस्थात्मक परिस्थितींसाठी खास मार्गदर्शक तत्त्वांसहित अग्रक्रमाने चाचण्या करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली.[7]

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- **दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना संस्थांमधून मुक्त करणे** आणि परिवार आणि/किंवा अनौपचारिक नेटवर्क्सद्वारे त्वरित त्यांना समाजात साहाय्य उपलब्ध करून देणे, आणि अशा साहाय्य सेवांसाठी सार्वजनिक किंवा खासगी सेवा प्रदात्यांकरवी निधी उपलब्ध करून देणे.

- **दरम्यानच्या काळामध्ये संस्थांमध्येच चाचण्यांना अग्रक्रम देणे आणि प्रतिबंधात्मक उपायांना उत्तेजन देणे,** म्हणजे एका जागी जास्त गर्दी होण्यावर उपाय करणे, निवासींसाठी शारीरिक अंतर राखण्याबद्दल अंमलबजावणी करणे, भेटण्याच्या वेळा बदलणे, संरक्षक सामग्रीचा वापर अनिवार्य करणे, आणि स्वच्छताविषयक परिस्थिती सुधारणे याद्वारे बाधा होण्याचा धोका कमी करता येऊ शकेल.

- प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणण्यासाठी **संस्थांची मानवी आणि आर्थिक व इतर संसाधने *तात्पुरती* वाढवणे.**
- **आपत्कालीन परिस्थितीमध्ये संस्थांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या हक्कांचा मान राखला जात राहील याची खात्री करणे**, यात गैरफायदा घेणे, उत्पीडन, हिंसा आणि वाईट वागणूक यांपासून मुक्ती, पक्षपातरहित वागणूक, मुक्त आणि माहितीपूर्वक संमतीचा हक्क, आणि न्यायाची उपलब्धता यांचाही समावेश आहे.[8]
- दिव्यांगे असणाऱ्या व्यक्ती आणि वृद्ध व्यक्तींसाठी साहाय्य आणि सेवा अधिक मजबूत करणे आणि संस्था बंद करून लोकांना समाजामध्ये परत आणणे यासाठी **संस्था बंद करण्याची धोरणे पुन्हा स्वीकारून आणि वापरून परिस्थिती सुधारणे**.

**संसाधने**

- डब्ल्यूएचओ कोविड-19 च्या संदर्भात जंतुबाधा रोखण्यासाठी आणि नियंत्रणासाठी दीर्घकालीन निगा सुविधांसाठी मार्गदर्शन अंतरिम मार्गदर्शन, 21 मार्च 2020

- डब्ल्यूएचओ, कोविड-19 च्या साथीच्या काळातील अपंगत्वांबाबतचे विचार

- [कोविड-19 च्या संदर्भात मानसिक-सामाजिक दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे निवेदन आणि शिफारसी]()

### 3. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या, समाजात राहण्याच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना, कोविड-19 ला दिलेल्या प्रतिसादात्मक उपायांमुळे त्यांचे समाजातील दैनंदिन जीवन चालू ठेवण्यासाठी विशिष्ट अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. विशेषतः घरी राहण्याची बंधने, जी त्यांच्या गरजा विचारात घेत नाहीत, ती त्यांच्या स्वातंत्र्य, आरोग्य व जीवनामध्ये व्यत्यय आणतात व नवीन धोके उत्पन्न करतात.[9]

दिव्यांगे असलेल्या अनेक व्यक्ती ज्या रोजच्या जीवनासाठी इतरांवर अवलंबून असतात (सेवा प्रदात्यांच्या औपचारिक साहाय्यावर किंवा नातेवाईक/मित्रमंडळींच्या अनौपचारिक साहाय्यावर), त्यांना आपला आधार गमावल्याचे दिसते, आणि जाण्यायेण्यावरील मर्यादा आणि शारीरिक अंतर राखण्याचे उपाय ही त्याची कारणे आहेत. यामुळे त्यांना अन्नपदार्थ, आवश्यक वस्तू, औषधे मिळू शकत नाहीत आणि स्नान करणे, स्वयंपाक करणे किंवा खाणे यासारखी दैनंदिन कार्ये करणे शक्य होत नाही व त्यामुळे त्यांना अधिक धोके उत्पन्न होऊ शकतात.

कोविड-19 वरील उपायांची सार्वजनिक माहिती दिव्यांगे असणाऱ्या सर्व व्यक्तींना उपलब्ध होऊ शकणाऱ्या स्वरूपात व पद्धतींनी मिळेल अशा रीतीने कळवली जात नाही आणि प्रसारितही केली जात नाही (उदाहरणार्थ, साइन लँग्वेज वापरून अर्थ सांगणे, शीर्षके देणे, सहज वाचता येण्यासारखे स्वरूप इ.).

त्याचप्रमाणे काही दिव्यांगे असलेल्या व्यक्ती, जसे मानसिक-सामाजिक दिव्यांगे आणि स्वयंमग्नता विकार असलेल्या (ऑटिस्टिक) व्यक्तींना घरातच अडकून पडणे सहन होऊ शकेलच असे नाही. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी दिवसभर थोडा थोडा वेळ आणि काळजीपूर्वक घराबाहेर नेणे त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- **पॅराग्वे**[10] आणि **पनामा**[11] यांनी अशा प्रणाली विकसित केल्या आहेत की ज्यामुळे संबंधित माहिती सहज उपलब्ध होणाऱ्या स्वरूपांमध्ये पुरवली जाईल याची खात्री होईल. त्याचप्रमाणे **न्यूझीलंड**च्या आरोग्य मंत्रालयाने त्याच्या संकेतस्थळाचा एक भाग हा माहिती सहज उपलब्ध होणाऱ्या स्वरूपांमध्ये पुरवण्यासाठी राखून ठेवला आहे, यात साइन लँग्वेज आणि सहज वाचता येण्यासारखे स्वरूपही अंतर्भूत आहे. [12] **मेक्सिको** सरकारनेही अशाच प्रकारची पद्धत स्वीकारली आहे.[13]

- **अर्जेंटिना**मध्ये[14] साहाय्य पुरवणाऱ्या व्यक्तींना, दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींना साहाय्य करण्यासाठी येण्याजाण्यावरील आणि शारीरिक अंतर राखण्याच्या बंधनांमधून सूट देण्यात आली आहे. **कोलंबिया**मध्ये सामाजिक साहाय्य नेटवर्क्स विकसित झाली आहेत आणि ती अशा स्वयंसेवकांना काम देतात, जे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना आणि वृद्ध लोकांना त्यांचा किराणा माल आणि इतर खरेदीसाठी मदत करतात.[15] तसेच **पनामा**मध्ये धोके कमी करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून दिव्यांगे असलेल्या व्यक्ती व त्यांच्या वैयक्तिक सहाय्यकांना आवश्यक खरेदी करण्यासाठी दुकाने खुली असण्याच्या विशिष्ट वेळा नेमून देण्यात आल्या आहेत.[16]

- **युनायटेड किंग्डम ऑफ ग्रेट ब्रिटन आणि नॉर्दर्न आयर्लंड**[17] मध्ये स्वयंमग्नता विकार असलेल्या (ऑटिस्टिक) लोकांना आणि इतर दिव्यांगे असलेल्या लोकांना बाहेर जाता यावे यासाठी सुरुवातीला कडक असलेले घरात राहण्याचे नियम शिथिल करण्यात आले आणि त्यांच्यासाठी अपवाद अंतर्भूत करण्यात आले. **फ्रान्स**मध्येही अशाच प्रकारचे उपाय करण्यात आले आहेत.[18]

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- **कोविड-19 संबंधीच्या उपाययोजनांची माहिती दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसाठी उपलब्ध असेल** याची खात्री करणे, यामध्ये साइन लँग्वेज इंटरप्रिटेशन, शीर्षके देणे आणि सहज वाचता येण्यासारखी स्वरूपे व अन्य पद्धतीही समाविष्ट आहेत.
- **दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना साहाय्य करणाऱ्या लोकांना, त्यांना साहाय्य करण्यासाठी घरी राहण्याच्या बंधनामधून वगळले जाईल** याची खात्री करणे.
- **सामाजिक साहाय्य नेटवर्क्सच्या विकासाला** उत्तेजन देणे आणि त्यांच्यामध्ये समन्वय करणे, आणि खात्री करणे की संरक्षणाची सामग्री, वस्तू आणि उत्पादने उपलब्ध असतील.
- सुपरमार्केट्स, किराणा मालाची दुकाने आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या दुकानांमध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती आणि त्यांच्या साहाय्यकर्त्या लोकांना **अग्रक्रम देऊन**, घरीच राहण्याच्या बंधनांच्या काळामध्ये त्यांच्यासाठी **दुकाने खुली ठेवण्याचे कालावधी** ठरवण्याचा विचार करणे.
- सर्वांसाठी सरसकट घरातच थांबण्याची बंधने घालणे आणि घराबाहेर पडल्यास दंड करण्याच्या तरतुदी न करता दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसाठी **रास्त सवलती ठेवण्याची तरतूद करणे**, आणि त्यांना बाहेर पडण्यासाठी अपवाद निर्माण करणे.

**संसाधने**

- डब्ल्यूएचओ, कोविड-19 च्या साथीच्या काळातील अपंगत्वांबाबतचे विचार
- **यूएनपीआरपीडी, आयएलओ व इतर, कोविड-19 च्या संकटकाळामध्ये दिव्यांगे समाविष्ट असलेला सामाजिक संरक्षणविषयक प्रतिसाद**

## 4. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे काम, उत्पन्न व उदरनिर्वाहावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

इतरांच्या मानाने दिव्यांगे असलेल्या व्यक्ती नोकरी किंवा काम करत असण्याची शक्यता कमी असते आणि जेव्हा त्या काम करत असतात, तेव्हा त्या अनौपचारिक क्षेत्रामध्येच काम करत असण्याची शक्यता जास्त असते.[19] त्यामुळे त्यांना इतरांच्या तुलनेत नोकरीवर आधारित सामाजिक विमा कमी प्रमाणात उपलब्ध असतो, आणि सध्याच्या कोविड-19 च्या संदर्भात त्यांची आर्थिक संकटामधून वर येण्याची क्षमता कमी झालेली असते. जे लोक नोकरी करतात किंवा स्वयंउद्योजक आहेत[20] , त्यांना कामाच्या ठिकाणी असलेले साहाय्य आणि सामग्री घरी उपलब्ध नसल्यामुळे घरून काम करता येत नाही, आणि त्यामुळे त्यांना उत्पन्न आणि नोकरी गमावण्याचा धोका वाढलेला असतो. त्याशिवाय कोविड-19 साठी च्या उपायांमुळे, घरामधील लोक आणि मिळवत्या व्यक्तींना काम करणे शक्य नसल्यामुळे संपूर्ण घराचे उत्पन्न घटते आणि त्याचे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींवर अप्रत्यक्षरीत्या अनिष्ट परिणाम होऊ शकतात. उत्पन्नाच्या अभावामुळे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींवर आणि त्यांच्या घरांवर प्रमाणाबाहेर मोठे ओझे पडते, कारण त्यांना बहुतांश बाबतीत त्या दिव्यांगाच्या संदर्भात अधिक खर्च करावे लागत असतात (उपलब्ध असणारे गृह आणि सामग्री, सहाय्यक साधने, विशिष्ट वस्तू आणि सेवा इ.), आणि त्यामुळे ते गरीबीमध्ये आणखी वेगाने खोल बुडत जातात.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- कोविड-19 ला प्रत्युत्तर म्हणून **बल्गेरिया, माल्टा** आणि **लिथुआनिया** यांनी सामाजिक साहाय्य सेवा आणि दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसहित अधिक लाभार्थींना समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या सामाजिक संरक्षण व्यवस्थांना निधी पुरवठा वाढवला आहे.[21]
- **अर्जेंटिना व पेरूमध्ये** दिव्यांगासाठीचे लाभ मिळणाऱ्या लोकांना कोविड-19 मुळे आणखी रक्कम मिळेल.[22] **फ्रान्सने**सुद्धा अशाच प्रकारे दिव्यांगासाठीचा भत्ता लाभार्थींसाठी वाढवण्याची घोषणा केली,[23] आणि **ट्युनिशिया**च्या आपत्कालीन योजनेमध्ये कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना, आणि बेघर लोकांना रोख पैसे खात्यात जमा करण्याची योजना समाविष्ट आहे.[24]
- **युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाने**[25] करांमध्ये सवलती देण्याचे कार्यक्रम सुरू केले आहेत ज्यामुळे या संदर्भात दिव्यांगे असलेल्या व्यक्तींची आर्थिक तंगी कमी होऊ शकेल.

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- **कोणतेही उत्पन्न नसलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना आर्थिक मदत पुरवणे** (उदा., एकरकमी पैसे देणे, करामध्ये सूट देणे, वस्तूंच्या किमतींमध्ये अनुदान देणे इ.).
- **चालू असलेले दिव्यांगविषयक लाभ वाढवणे**, यात अतिरिक्त खर्च भागवण्यासाठी आगाऊ रकमा देणेही समाविष्ट आहे.
- कोणत्याही **लवकरच मुदत समाप्त होत असलेल्या, दिव्यांगाशी संबंधित लाभांची मुदत आपोआप वाढवणे.**
- स्वयंउद्योजक असलेल्या, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना **आर्थिक भरपाई देणे**, ज्यांचे उत्पन्न घटले आहे.
- अशा व्यक्तींसाठी **आर्थिक साहाय्य कार्यक्रम अमलात आणणे,** जे त्यांच्या परिवारातील दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना मदत करण्यासाठी किंवा त्यांना बाधा न होऊ देण्यासाठी काम करणे थांबवतात आणि ज्यांना बेरोजगारी किंवा आजारपणाचे लाभ मिळत नाहीत.
- दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या **मालकांना**, त्यांना घरी राहून काम करण्यासाठी आवश्यक सामग्री देण्यासाठी **टॅक्स क्रेडिट्ससहित आर्थिक साहाय्य** पुरवणे.
- अन्नपदार्थ घरपोच पोचवण्याच्या व्यवस्थेसहित **अन्न पुरवठा योजनांमध्ये** दिव्यांगे असलेल्या व्यक्ती समाविष्ट असल्याची, आणि योजना त्यांच्या गरजांना प्रतिसाद देत असल्याची खात्री करणे.

**संसाधने**

- **आयएलओ, कोणीही मागे राहिलेले नाही, आता नाही, कधीही नाही: कोविड-19 च्या प्रतिसादामध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती**
- **आयएलओ, कोणीही मागे राहिलेले नाही, आता नाही, कधीही नाही: कोविड-19 च्या प्रतिसादामध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती**
- इंटरनॅशनल मोनेटरी फंड, कोविड-19 ला धोरणात्मक प्रतिसाद

## 5. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या शिक्षणाच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

इतरांच्या मानाने दिव्यांगे असलेल्या व्यक्ती शिक्षण पूर्ण करण्याची शक्यता कमी असते, आणि शालेय शिक्षणामधून पूर्णपणे वर्जित केले जाण्याची शक्यता जास्त असते.[26] कोविड-19 मुळे बहुतेक सर्व राष्ट्रांनी शिक्षण संस्था बंद केल्या आहेत[27] ज्यामुळे दिव्यांगे असलेल्या विद्यार्थ्यांसहित सर्व विद्यार्थी परिणामग्रस्त झाले आहेत. शिक्षणातील या व्यत्ययाचा परिणाम कमी करण्यासाठी काही राष्ट्रे दूरस्थ शिक्षणाच्या पद्धती स्वीकारत आहेत. मात्र अशा बाबतीत दिव्यांगे असलेल्या विद्यार्थ्यांना अडथळे येत आहेत, कारण आवश्यक सामग्रीचा

त्यांच्याकडे अभाव आहे, इंटरनेट उपलब्ध नाही, ऑनलाइन शालेय शिक्षण कार्यक्रम चालू ठेवण्यासाठी आवश्यक साहित्य आणि साहाय्य उपलब्ध नाही. त्यामुळे दिव्यांगे असलेले, त्यातही बौद्धिक दिव्यांगे असलेले विद्यार्थी मागे राहात आहेत.

त्याशिवाय, दिव्यांगे असलेल्या विद्यार्थ्यांवर शाळा बंद होण्याच्या इतर पैलूंचाही अनिष्ट परिणाम होत आहे, यात शाळेतील भोजन न मिळणे आणि बरोबरच्या विद्यार्थ्यांसह खेळणे आणि क्रीडा करता न येणेही समाविष्ट आहे.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- **युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकाने** 'दिव्यांगे असलेली व्यक्ती कायदा' या राष्ट्रीय कायद्याच्या संबंधात एक मार्गदर्शक दस्तऐवज जारी केला.[28]
- **इक्वेडोरने** ज्या विद्यार्थ्यांना घरी एकटेच राहावे लागते त्यांच्या शिक्षणाला साहाय्य करणाऱ्या शिक्षकांसाठी शिफारसी जारी केल्या.[29]
- **युनायटेड किंग्डम ऑफ ग्रेट ब्रिटन आणि नॉर्दर्न आयर्लंडने** मातापिता आणि निगादात्यांना, घरी असताना एकमेकींशी स्पर्धा करणाऱ्या जबाबदाऱ्यांना कसे तोंड द्यावे आणि दिव्यांगे असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेला अधिक चांगले साहाय्य कसे करावे, यासाठी साहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी माहिती प्रसारित केली आणि व्यवस्था प्रस्थापित केल्या.[30]

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- शिक्षण आणि शालेय अधिकाऱ्यांना शाळेबाहेर शिक्षण पुरवताना उपलब्ध असलेले विविध स्त्रोत आणि त्यांच्या जबाबदाऱ्या याबाबत **स्पष्ट मार्गदर्शन पुरवणे**.
- दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना, सहाय्यकारी उपकरणांसहित आणि रास्त निवास व्यवस्थेसहित **दूरस्थ शिक्षणासाठी इंटरनेट उपलब्ध असेल आणि सॉफ्टवेअर उपलब्ध असेल याची खात्री करणे**.
- **शिक्षकांना** दूरस्थ शिक्षणाद्वारे सर्वसमावेशक शिक्षणाबद्दल **मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि साहाय्य पुरवणे**.
- दिव्यांगे असलेल्या लहान मुलांच्या सुरुवातीच्या शिक्षणासाठी मातापिता आणि निगादात्यांसह **जवळून समन्वय साधणे**.
- **मातापिता आणि निगादात्यांना**, त्यांच्या दिव्यांग असलेल्या लहान मुलांची शिक्षण प्रणाली स्थापित करण्यासाठी सामग्री करण्यास मदत करण्यासाठी आणि साहाय्य करण्यासाठी **मार्गदर्शन आणि दूरस्थ साहाय्य पुरवणे**.
- दूरस्थ शिक्षणाला साहाय्य करण्यासाठी दिव्यांग असलेल्या विद्यार्थ्यांना **उपलब्ध होऊ शकणारे आणि अनुकूल केलेले साहित्य विकसित करणे.**
- विविध माध्यमांमधून प्रसारित करण्यासाठी (उदा. मागणीवरून ऑनलाइन, टेलिव्हिजनवर सादर करण्याचे शैक्षणिक कार्यक्रम इ.) **उपलब्ध होऊ शकणारे दृकश्राव्य शैक्षणिक साहित्य विकसित करणे.**

**संसाधने**

- सीआरसी कमिटीचे निवेदन, लहान मुलांवरील कोविड-19 चे गंभीर शारीरिक, भावनिक आणि मानसिक-सामाजिक दुष्परिणाम आणि राष्ट्रांना उद्देशून केलेली लहान मुलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठीची आवाहने
- युनिसेफ, कोविड-19 ला प्रतिसाद: दिव्यांगे असलेली लहान मुले आणि प्रौढ व्यक्तींबाबत केलेले विचार
- युनेस्को, कोविड-19 ला प्रतिसादासंबंधीचे संकेतस्थळ

## 6. दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या, हिंसेपासून रक्षणाच्या हक्कावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

दिव्यांगे असलेल्या व्यक्ती, विशेषतः त्या जेव्हा एकाकी असतील तेव्हा त्यांना हिंसेचा अधिक मोठा धोका असतो. दिव्यांगे असलेल्या स्त्रिया व मुलींना लिंग, लैंगिक, जवळचे जोडीदार आणि कौटुंबिक हिंसेला अधिक मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते.[31] दिव्यांगे असलेल्या स्त्रिया व मुलींना इतर स्त्रियांच्या मानाने हिंसेचा अधिक मोठा धोका असतो, इतकेच नव्हे, तर त्यांना दिव्यांगे असलेल्या पुरुषांच्या तुलनेतही जास्त मोठ्या प्रमाणात हिंसा अनुभवाला येते.[32] सध्या कोविड-19 च्या संदर्भात दिव्यांग आणि लिंगावर आधारित हिंसेबद्दल जरी माहिती उपलब्ध नसली, तरी अनुभव हेच दर्शवतो की समान परिस्थिती असताना दिव्यांगे असलेल्या लोकांना विशेषतः धोका असतो.[33]

दिव्यांगे असलेल्या लोकांसाठी कौटुंबिक हिंसेची बातमी देणे आणि कौटुंबिक हिंसाविषयक सेवांची आणि मदतीची उपलब्धता हे विशेष आव्हानात्मक असते, कारण या सेवा सहसा दिव्यांग असलेल्या व्यक्तींना समाविष्ट करत नाहीत व त्या त्यांच्यासाठी उपलब्धही नसतात. हॉटलाइन्समध्ये बहिऱ्या आणि बहिऱ्या-अंध लोकांसाठी दुभाषी सेवा अनेकदा उपलब्ध नसतात, आणि आपत्कालीन आश्रयगृहे आणि सेवा या दिव्यांगे असलेल्या लोकांच्या गरजा भागवण्यासाठी तयार नसतात.

### काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?

**पेरूमध्ये** स्थानिक शासनांना मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यात आली की त्यांनी संकटकाळामध्ये हिंसात्मक घटना अधिकाऱ्यांना कळवण्याच्या कामासाठी दिव्यांगे असलेल्या व्यक्तींशी दूरध्वनी संपर्क साधावा, आणि आपत्कालीन पतिस्थिती उठवण्यात आल्यावर प्रत्यक्ष भेटून संपर्क साधावा.[34] याच्या व्यतिरिक्त ओएचसीएचआरला या क्षेत्रामध्ये कोणत्याही आश्वासक पद्धती सापडल्या नाहीत, ज्यामुळे चिंता वाढते. अनेक देश अजूनही बहिऱ्या लोकांसाठी उपलब्ध होणाऱ्या हॉटलाइन्स, मदत आणि रिपोर्टिंग करत आहेत, यात बहिऱ्या लोकांनी टेक्स्टद्वारे संदेश पाठवणे, रीले आणि व्हिडिओ फोन सेवाही समाविष्ट आहेत.[35] काही चांगल्या पद्धती खाली दिलेल्या संसाधनांच्या सूचीत उल्लेखित केल्या आहेत.

### राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?

- **खात्री करणे की बातमी देण्याच्या प्रणाली, हॉटलाइन्स, आणीबाणीच्या काळातील आश्रय, आणि मदतीचे इतर प्रकार हे दिव्यांगे असलेल्या व्यक्तींसाठी उपलब्ध असतील आणि त्या त्यांमध्ये समाविष्ट असतील.**
- दिव्यांगे असलेल्या व्यक्ती, विशेषतः एकाकी राहणाऱ्या व्यक्तींच्या **परिस्थितीवर लक्ष ठेवणे**; यासाठी समाजामार्फत आणि स्वयंसेवक नेटवर्क्सच्या मार्फत स्वतः पुढाकार घेणे.
- दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना असलेल्या, त्यातही दिव्यांगे असलेल्या स्त्रिया व मुलींना असलेल्या हिंसेच्या धोक्याबाबत **प्रबोधन करणे व प्रशिक्षण देणे**, आणि त्यांच्याचसारख्या व्यक्तींच्या साहाय्यासहित साहाय्याच्या नेटवर्क्सना उत्तेजन देणे.

### संसाधने

- यूएनएफपीए, दिव्यांगे असलेल्या स्त्रिया आणि किशोरवयीन लोकांसाठी हक्कांवर आधारित आणि लिंगाधारित हिंसा आणि लैंगिक आणि प्रजननविषयक आरोग्य सेवा पुरवण्याबद्दल मार्गदर्शक तत्वे
- कोविड-19 च्या काळामध्ये अपंगत्वांसह जिवंत राहणाऱ्यांसाठी त्यांना जीवित ठेवण्याच्या सेवा

## 7. अशा विशिष्ट लोकसंख्या समूहांवर, ज्यांमध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती नको इतक्या प्रमाणात आहेत: दिव्यांगे असलेले कैदी आणि पुरेशा निवासाची सोय नसलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्ती, यांच्यावर कोविड-19 चा काय परिणाम होत आहे?

### अ. दिव्यांगे असलेले कैदी

तुरुंगांमधील लोकांमध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती[36], त्यातही मानसिक-सामाजिक दिव्यांगे आणि बौद्धिक दिव्यांगे असलेले लोक नको इतक्या प्रमाणात असतात. त्यांना जंतुबाधेचा धोका अधिक असतो कारण गर्दीमध्ये आणि अस्वच्छ स्थितींमध्ये जंतुबाधेचा मोठा धोका असतो, आणि शारीरिक अंतर राखणे शक्य होत नाही. विशेषतः दिव्यांगे असलेले अनेक कैदी अन्न मिळवण्यासाठी, हिंडण्याफिरण्यासाठी आणि स्नानासाठी त्यांच्या सहकैद्यांवर अवलंबून असतात, आणि तुरुंगातील आरोग्यसेवा त्यांच्या गरजा भागवण्यासाठी बहुतांश पुरेशा नसतात.

या आव्हानांना फक्त गुन्हेगारी न्याय आणि तुरुंग व्यवस्थेमधील तुरुंगवासी आणि खटल्यापूर्वी ताब्यात घेतलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींनाच तोंड द्यावे लागते असे नाही, तर अशा लोकांनाही या आव्हानांना तोंड द्यावे लागते, जे सध्या कोणत्याही प्रकारच्या प्रशासकीय किंवा अन्य प्रकारच्या कारावासात आहेत, यात इमिग्रेशनसाठी कारावासात असलेले स्थलांतर करणारे दिव्यांगे असलेले लोकही येतात.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- **युनायटेड किंग्डम ऑफ ग्रेट ब्रिटन आणि नॉर्दर्न आयर्लंडमध्ये** ज्यांच्या शिक्षेचे दोन महिने किंवा त्याहून कमी कालावधी पूर्ण होणे बाकी आहे, अशा कैद्यांना सोडून दिले जात आहे.[37] **युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये** अनेक राज्यांनी कैद्यांना सोडून दिले आहे किंवा ती प्रक्रिया चालू आहे.[38] **इराण, टर्की आणि इंडोनेशियामध्येही** अशाच प्रकारे कैद्यांना सोडून दिले जात आहे. **कोलंबिया**मध्ये ज्या दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींना स्वतः संरक्षण साधने परिधान करण्याशी संबंधित शारीरिक कार्यांमध्ये अडचणी येतात, त्यांना मुदतीपूर्वी सोडण्याच्या सवलतीच्या लाभार्थींमध्ये समाविष्ट केले गेले आहे.[39] त्याचप्रमाणे **अर्जेंटिना**मध्ये सुप्रीम कोर्ट आणि क्रिमिनल अपील कोर्टांनी दिव्यांगे असणाऱ्या व्यक्तींना मुदतीपूर्वी सोडण्याच्या सवलतीच्या लाभार्थींमध्ये समाविष्ट केले आहे.[40] **ब्राझिलमध्ये** नॅशनल जस्टिस काउन्सिलने अल्पवयीन गुन्हे प्रणालीमधील दिव्यांगे असलेल्या कैद्यांसहित दिव्यांगे असलेल्या सर्व कैद्यांचा आढावा घ्यावा, त्यांचे पुन्हा मूल्यमापन करावे आणि त्यांना सोडून द्यावे अशी शिफारस केली.[41]

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- **दिव्यांगे असलेल्या कैद्यांसहित ज्यांना धोका आहे अशा कैद्यांना सोडून देऊन तुरुंगांमधील संख्या कमी करणे, त्यासाठी मुदतीपूर्वी सोडण्याचे आणि प्रोबेशनचे नियम किंवा त्यांच्या शिक्षा कमी करणे आणि खटल्यापूर्वी अटकेत ठेवण्याची प्रकरणे कमी करणे,** आणि त्वरित खात्री करणे की त्यांना समाजामध्ये कुटुंबीय आणि/किंवा अनौपचारिक नेटवर्क्सद्वारे साहाय्य मिळेल आणि साहाय्य सेवांना सार्वजनिक किंवा खाजगी सेवा प्रदात्यांकरवी निधी पुरवला जाईल.

- तुरुंगामध्ये जंतुबाधेचा धोका कमी करण्यासाठी **प्रतिबंधक उपाय करणे**, यामध्ये दिव्यांगे असणाऱ्या कैद्यांना ओळखून त्यांना मदत, अन्न, पाणी आणि स्वच्छता उपलब्ध होईल याचे खात्री करणे; विलगीकरण आणि शारीरिक अंतर राखण्याचे उपाय अमलात आणणे, संरक्षक साधनांचा वापर अनिवार्य करणे, आणि स्वच्छताविषयक परिस्थिती सुधारणे समाविष्ट आहे.

**संसाधने**

- [डब्ल्यूएचओ, तुरुंग आणि अटकेत ठेवण्याच्या अन्य ठिकाणी कोविड-19 चा प्रतिबंध व नियंत्रण]
- [यूएन इंटर एजन्सी स्टँडिंग कमिटी, कोविड-19: स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आलेल्या व्यक्तींकडे विशेष लक्ष]

## ब. पुरेशा निवासाची सोय नसलेल्या दिव्यांगे असलेल्या व्यक्ती

दिव्यांगे असलेल्या व्यक्ती, विशेषतः मानसिक-सामाजिक आणि बौद्धिक दिव्यांगे असलेल्या व्यक्ती सर्वात गरीब जनतेमध्येही मोठ्या प्रमाणात असतात. दिव्यांगे असलेल्या निराश्रित व्यक्ती आणि आणीबाणी आश्रयगृहांमध्ये राहणाऱ्या आणि अनौपचारिक वस्त्यांमध्ये राहणाऱ्या दिव्यांगे असलेल्या व्यक्तींना कोविड-19 होण्याचा अधिक धोका असतो, कारण अशा जागी प्रमाणाबाहेर गर्दीत ते राहतात, तेथे पाणी आणि स्वच्छता यांची वानवा असते, आणि त्यांना आधीच असलेले आरोग्य विकारही कारणीभूत असतात.

कोविड-19 च्या आणीबाणीने दिव्यांगे असलेल्या लोकांसहित इतर निराश्रित लोकांना आसरा आणि साहाय्य शोधायला भाग पाडले आहे, त्यामुळे आणीबाणी आश्रयगृहांमध्ये प्रमाणाबाहेर गर्दी होऊन या विषाणूचा प्रसार होत आहे. जे लोक त्यांच्या निवास व्यवस्थांमुळे शारीरिक अंतर राखू शकत नाहीत, ते सुद्धा कमजोर परिस्थितीमध्ये आहेत.

**काही आश्वासक पद्धती कोणत्या आहेत?**

- **युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये** निराश्रितांसाठीच्या प्रतिसादाची अंमलबजावणी [विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वांमार्फत] करण्यात आली आहे, ज्यांमध्ये कळवण्यात आल्यास दिव्यांगाच्या बाजूचाही विचार करण्यात आला आहे.
- **चिलीमध्ये** सरकारने निराश्रित लोकांना रस्त्यावर आरोग्य सेवा पुरवण्यामध्ये वाढ करण्याचे जाहीर केले.
- अर्जेंटिनामध्ये एका मोठ्या सुविधेमध्ये 1000 हून अधिक खाटा पुरवण्यात आल्या, त्या अशा लोकांना आश्रय देण्यासाठी आहेत, ज्यांना फारशा वैद्यकीय गरजा नसूनही शारिरिक अंतर राखण्याची गरज असू शकते.

**राष्ट्रे आणि इतर स्टेकहोल्डर्स ज्या करू शकतात अशा महत्त्वाच्या काही कृती कोणत्या आहेत?**

- **खात्री करणे की दिव्यांगे असणाऱ्या निराश्रित व्यक्तींना सन्मानपूर्वक वागवले जाईल**, आणि त्यांना प्रथम प्रतिसाद देणाऱ्या लोकांना हिंसक प्रसंग टाळण्यासाठी, विनंती केल्यास **प्रशिक्षण आणि मार्गदर्शन** केले जाईल.
- **अनौपचारिक वस्त्यांचे जबरदस्तीने उच्चाटन टाळणे**, कारण यामुळे विषाणूचा प्रसार अधिक जोराने होऊ शकतो. दिव्यांगे असलेल्या निराश्रितांना ते जेथे राहतात तेथेच उपचार देणे आणि उपलब्ध असेल तेथे सुरक्षित आश्रय देऊ करणे.
- **आश्रयगृहांचे विविध पर्याय शोधणे जेथे शारीरिक अंतर राखता येईल**, यामध्ये भाड्याने घेतलेली घरे, हॉटेल्स, कॉन्फरन्स सेंटर्स, आणि स्टेडियम्स असू शकतील, जेथे स्वच्छतेच्या आणि व्यवस्थित राहण्याच्या व्यवस्था आहेत.
- रस्त्यांवर स्वच्छतेच्या सुविधा पुरवणे, यात पाणी, साबण, सिंक आणि इतर संसाधने समाविष्ट असतील ज्यामध्ये पाणी आणि स्वच्छतेच्या सोयी असल्याची खात्री असेल.

**संसाधने**

- यूएन स्पेशल रॅपोर्टियर, पर्याप्त गृहव्यवस्थेच्या हक्काबद्दल, कोविड-19 मार्गदर्शन: निराश्रित अवस्थेत राहणाऱ्यांचे संरक्षण
- यूएन स्पेशल रॅपोर्टियर, पर्याप्त गृहव्यवस्थेच्या हक्काबद्दल, कोविड-19 मार्गदर्शन: अनौपचारिक वस्त्यांमधील रहिवाशांचे संरक्षण

## संसाधने – सर्वसाधारण

- सीआरपीडी कमिटी आणि यूएन महासचिवांचे खास दूत, दिव्यांग आणि उपलब्धता याविषयी, संयुक्त पत्रक: दिव्यांगे असलेल्या व्यक्ती आणि कोविड-19
- इंटरनॅशनल डिसॅबिलिटी अलायन्स, कोविड-19 आणि दिव्यांगविषयक चळवळ
- इंटरनॅशनल डिसॅबिलिटी अँड डेव्हलपमेंट कन्सॉर्शियम: दिव्यांगाच्या अंतर्भावाच्या संसाधनांचे भांडार आणि कोविड-19
- आयएलओ, कोणीही मागे राहिलेले नाही, आता नाही, कधीही नाही: कोविड-19 च्या प्रतिसादामध्ये दिव्यांगे असलेल्या व्यक्ती
- रीजनल अँड इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन्स ऑफ पीपल विथ सायकोसोशल डिसॅबिलिटीज, कोविड-19 आणि दिव्यांगे असलेल्या व्यक्तींविषयी शिफारसींसहित पत्रक
- बळी पडू शकणारे समूह कोविड-19 च्या प्रतिसादात मागे नाहीत याच्या खात्रीसाठी यूएन चे कामकाज
- यूएन ईएससीएपी: दिव्यांगविषयक हक्कांची सुनिश्चिती आणि कोविड-19 च्या प्रतिसादामध्ये समावेश
- यूएन इंटर एजन्सी स्टँडिंग कमिटी, कोविड-19: स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आलेल्या व्यक्तींकडे विशेष लक्ष
- यूएनपीआरपीडी, आयएलओ व इतर, कोविड-19 च्या संकटकाळामध्ये दिव्यांगे समाविष्ट असलेला सामाजिक संरक्षणविषयक प्रतिसाद
- यूएन स्पेशल रॅपोर्टियर्स आणि स्वतंत्र तज्ज्ञ, कोविड-19 बाबत कोणतेही अपवाद नाहीत: "प्रत्येकाला जीवनरक्षक हस्तक्षेपांचा हक्क आहे"
- यूएन स्पेशल रॅपोर्टियर दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या हक्कांच्या संबंधी, कोविड-19: दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे रक्षण कोण करत आहे?
- यूएनएफपीए, दिव्यांगे असलेल्या स्त्रिया आणि किशोरवयीन लोकांसाठी हक्कांवर आधारित आणि लिंगाधारित हिंसा आणि लैंगिक आणि प्रजननविषयक आरोग्य सेवा पुरवण्याबद्दल मार्गदर्शक तत्वे
- युनिसेफ, कोविड-19 ला प्रतिसाद: दिव्यांगे असलेली लहान मुले आणि प्रौढ व्यक्तींबाबत केलेले विचार
- डब्ल्यूएचओ, कोविड-19 च्या साथीच्या काळातील अपंगत्वांबाबतचे विचार
- डब्ल्यूएचओ कोविड-19 च्या संदर्भात जंतुबाधा रोखण्यासाठी आणि नियंत्रणासाठी दीर्घकालीन निगा सुविधांसाठी मार्गदर्शन अंतरिम मार्गदर्शन, 21 मार्च 2020
- डब्ल्यूएचओ, तुरुंग आणि अटकेत ठेवण्याच्या अन्य ठिकाणी कोविड-19 चा प्रतिबंध व नियंत्रण

---

[1] पाहा http://www.sanita.sm/on-line/home/bioetica/comitato-sammarinese-di-bioetica/documents-in-english/documento2116023.html.
[2] पाहा https://www.hhs.gov/sites/default/files/ocr-bulletin-3-28-20.pdf.
[3] पाहा https://www.khaleejtimes.com/coronavirus-pandemic/combating-coronavirus-uae-launches-home-testing-programme-for-people-of-determination

4 पाहा https://www.facebook.com/pg/chrgovph/photos/?tab=album&album_id=2681151298668065&__tn__=-UC-R

5पाहाhttps://www.canada.ca/en/employment-social-development/news/2020/04/backgrounder--covid-19-disability-advisory-group.html

6 ॲडेलिना कोमास-हेरेरा आणि जोसेबा झालाकेन, "शुश्रुषा गृहांमधील कोविड-19 च्या साथीशी संबंधित मृत्यूदर: सुरुवातीच्या काळातील आंतरराष्ट्रीय पुरावे", इंटरनॅशनल लाँग टर्म केअर पॉलिसी नेटवर्क, 12 एप्रिल 2020, पृ 5.

7 पाहा http://www.health.gov.on.ca/en/pro/programs/publichealth/coronavirus/docs/2019_covid_testing_guidance.pdf

8 रीजनल अँड इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन्स ऑफ पीपल विथ सायकोसोशल डिसॅबिलिटीज, कोविड-19 आणि दिव्यांगे असलेल्या व्यक्तींविषयी शिफारसींसहित पत्रक येथे पाहा: https://dkmedia.s3.amazonaws.com/AA/AG/chrusp-biz/downloads/357738/COVID19-and-persons-with-psychosocial-disabilities-final_version.pdf

9 चीनमधील साथीच्या सुरुवातीच्या काळात सेरेब्रल पाल्सी असलेल्या एका 16 वर्षांच्या किशोराचा मृत्यू झाला, कारण त्याच्या कुटुंबाला विलग करण्यात आले, ज्यामुळे तो असहाय्य झाला.

10 पॅराग्वेच्या डिसॅबिलिटी फोकल पॉइंटने (सेनाडिस) त्यांच्या सामाजिक माध्यमाचा वापर साइन लँग्वेजमध्ये माहिती पुरवण्यासाठी सुरू केला, व अशा रीतीने बहिऱ्या लोकांना ती उपलब्ध होण्यास उत्तेजन मिळाले.

11 पहा सेनाडिस, पनामा टोमा मेडिडास पारा ला इनक्लुजन दे लास पर्सोनास कॉन डिकपॅटिडाद फ्रेंटे अल कोविड-19, 3.1.

12 पाहा https://www.health.govt.nz/our-work/diseases-and-conditions/covid-19-novel-coronavirus/covid-19-novel-coronavirus-resources/covid-19-novel-coronavirus-new-zealand-sign-language

13 पाहा https://coronavirus.gob.mx.

14 अर्जेंटिना, Decree 297/2020, कलम 6.5.

15 अशा पद्धतीला राष्ट्रे उत्तेजन देतात, जसे कोलंबिया (पाहा https://www.minsalud.gov.co/sites/rid/Lists/BibliotecaDigital/RIDE/DE/PS/asif13-personas-con-discapacidad.covid-19.pdf)

16 पाहा सेनाडिस, पनामा टोमा मेडिडास पारा ला इनक्लुजन दे लास पर्सोनास कॉन डिकपॅटिडाद फ्रेंटे अल कोविड-19, 3.3.

17 पाहा युनायटेड किंग्डम ऑफ ग्रेट ब्रिटर अँड नॉर्दर्न आयर्लंड, करोनाव्हयरस उद्रेक वारंवार विचारले जाणारे प्रश्न: आपण काय करू शकता आणि काय नाही, भाग 15.

18 सेक्रेटरिएट द'एतात ऑप्रेस दु प्रिमियर मिनिस्ट्र चार्ज द पर्सोन्स हँडिकॅपीज, येथे: https://handicap.gouv.fr/autisme-et-troubles-du-neuro-developpement/infos-speciales-coronavirus/article/information-covid-19-et-confinement

19 पाहा ओईसीडी, सिकनेस, *डिसॅबिलिटी अँड वर्क, ब्रेकिंग द बॅरिअर्स,* पृष्ठ 23, **ज्यामध्ये दाखवले आहे की दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे निष्क्रियतेचे प्रमाण इतरांच्या तुलनेत अधिक असते: अनुक्रमे 49% आणि 20%.**

20 पाहा यूएनडीईएसए, *डिसॅबिलिटी अँड डेव्हलपमेंट रिपोर्ट,* पृष्ठ 157, आकृती II.81, **ज्यामध्ये दाखवले आहे की दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे स्वयंउद्योजकांमध्ये प्रमाण 9% अधिक आहे (19 देशांमधील आकडेवारी)**

21 बल्गेरिया, State Gazette, 24 March 2020, कलम.12; आयएमएफ, पॉलिसी रिस्पॉन्सेस टु कोविड-19, https://www.imf.org/en/Topics/imf-and-covid19/Policy-Responses-to-COVID-19#T

22 पाहा https://www.argentina.gob.ar/noticias/bono-extraordinario-para-las-personas-con-discapacidad-que-cobran-pensiones-no

23 पाहा https://informations.handicap.fr/a-prime-solidaire-aah-covid-12818.php

24 आयएमएफ, पॉलिसी रिस्पॉन्सेस टु कोविड-19, https://www.imf.org/en/Topics/imf-and-covid19/Policy-Responses-to-COVID-19#T

25 पाहा https://www.benefits.gov/benefit/945

26 उदा. प्राथमिक शाळेसाठी शिक्षण पूर्ण करण्याच्या इतरांच्या 73% प्रमाणाच्या तुलनेत दिव्यांगे असलेल्या व्यक्तींचे प्रमाण 56% आहे.

27 युनेस्कोच्या अंदाजानुसार व्यवहार बंद झाल्यामुळे जगातील 91% हून अधिक विद्यार्थी वर्गावर परिणाम होत आहे. पाहा https://en.unesco.org/covid19/educationresponse

28 पाहा यूएसए, शिक्षण मंत्रालय, दिव्यांगे असलेल्या मुलांना करोनाव्हायरस रोग 2019 उद्रेकाच्या दरम्यान सेवा पुरविण्याबाबत प्रश्न आणि उत्तरे, मार्च 2020.

29 पाहा https://educacion.gob.ec/wp-content/uploads/downloads/2020/03/Anexo-2-RECOMENDACIONES-A-LOS-DOCENTES-PARA-BRINDAR-APOYO-PEDAGÓGICO-A-LOS-ESTUDIANTES-EN-AISLAMIENTO-EN-FUNCIÓN-DE-PREVENIR-POSIBLES-CONTAGIOS-POR-ENFERMEDADES-RESPIRATORIAS.pdf

30 पाहा युनायटेड किंग्डम, https://www.gov.uk/guidance/supporting-your-childrens-education-during-coronavirus-covid-19. तसेच पाहा, https://www.gov.uk/guidance/help-children-with-send-continue-their-education-during-coronavirus-covid-19

31 वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, *कोविड-19 अँड व्हायोलन्स अगेन्स्ट विमेन व्हॉट द हेल्थ सेक्टर कॅन डू,* येथे: https://apps.who.int/iris/bitstream/handle/10665/331699/WHO-SRH-20.04-eng.pdf

32 पाहा यूएनडीईएसए, *डिसॅबिलिटी अँड डेव्हलपमेंट रिपोर्ट,* पृष्ठ 7, 16, 113-115, 249-252, येथे: https://social.un.org/publications/UN-Flagship-Report-Disability-Final.pdf; स्पेशल रॅपोर्टिअर, दिव्यांगे असलेल्या व्यक्तींच्या विशेष हक्कांविषयी, A/72/133, परिच्छेद 35.

33 एम्मा पीअर्स, *डिसॅबिलिटी कन्सिडरेशन्स इन जीबीव्ही प्रॉग्रॅमिंग ड्युरिंग द कोविड-19 पँडेमिक,* येथे: https://gbvaor.net/sites/default/files/2020-03/Disability%20Considerations%20in%20GBV%20programming%20during%20COVID_Helpdesk.pdf

34 पेरु, *मिनिस्टेरिओ द डेसारोलो ए इन्क्लुजन सोशल, रेझोल्युशन व्हाइसमिनिस्टेरिअल नं N° 001-2020-मिडिस/व्हीएमपीएएस, 24 एप्रिल 2020, येथे:* https://www.gob.pe/institucion/midis/normas-legales/484313-001-2020-midis-vmpes

[35] ऑस्ट्रेलियाची राष्ट्रीय लैंगिक जबरदस्ती, घरातील आणि कौटुंबिक हिंसाविषयक समुपदेशन सेवा, https://www.1800respect.org.au/accessibility/ ; यूकेचे करोनाव्हायरस (कोविड-19): घरातील हिंसेला बळी पडणाऱ्यांसाठी साहाय्य https://www.gov.uk/government/publications/coronavirus-covid-19-and-domestic-abuse/coronavirus-covid-19-support-for-victims-of-domestic-abuse#disability-specialist-services

[36] पीनल रिफॉर्म इंटरनॅशनल, ग्लोबल प्रिझन ट्रेंड्स, येथे: https://cdn.penalreform.org/wp-content/uploads/2020/04/Global-Prison-Trends-2020-Penal-Reform-International.pdf

[37] मार्गदर्शन: करोनाव्हायरस (कोविड-19) आणि कारागृहे, येथे: https://www.gov.uk/guidance/coronavirus-covid-19-and-prisons

[38] https://www.prisonpolicy.org/virus/virusresponse.html

[39] कोलंबिया, डेक्रेटो लेजिस्लाटिव्हो 546, 14 एप्रिल 2020, येथे: https://dapre.presidencia.gov.co/normativa/normativa/DECRETO%20546%20DEL%2014%20DE%20ABRIL%20DE%202020.pdf

[40] अर्जेंटिना, नॅशनल सुप्रीम कोर्ट ऑफ जस्टिस, *ॲकॉर्डाडा 10/2020*, आणि पूरक नियम, फेडरल कोर्ट ऑफ क्रिमिनल अपील, *ॲकॉर्डाडा 9/2020*, येथे: https://cnpt.gob.ar/wp-content/uploads/2020/04/Acordada-9.20-CFCP.pdf

[41] ब्राझील, नॅशनल जस्टिस कौन्सिल, शिफारस 62, 17 मार्च 2020, येथे: https://www.cnj.jus.br/wp-content/uploads/2020/03/62-Recomenda%C3%A7%C3%A3o.pdf.